अनुसूचित जाती प्रवर्गातील पोट आरक्षणाचे जातीय राजकारण : मातंग समाज एक चिकित्सक अभ्यास (विशेष संदर्भ मराठवाडा प्रदेश)

1.1 प्रस्तावना :

महात्मा ज्योतिबा फुले यांनी प्रथमच मांडलेला अमुलाग्र सामाजिक परिवर्तनाचा विचार काळानुरुप पुढे नेण्याचे काम राजर्षी शाहू महाराज आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. एकीकडे फुले-शाहू-आंबेडकरांची सामाजिक क्रांतीचे प्रणेते म्हणून लोकप्रियता वाढत असतांना दुसऱ्या बाजूने त्यांचा वैचारिक वारसा मात्र क्षीण होतांना दिसतो या तिन्ही महान विचारवंतांनी विषमतेवर आधारीत जाती व्यवस्था नष्ट करुन समता व सामाजिक न्याय मुल्यप्रधान समाजाचे स्वप्न पाहिले होते. डॉ.बाबासाहेबा आंबेडकरांनी उभा केलेला जाती अंताचा व समतेचा लढा जातीच्या परिघा बाहेर नेवून तो विचाराच्या पातळीवर उभा करणे अपेक्षीत असताना मात्र जाती व्यवस्थेने आंबेडकरी व दलित चळवळीला आपोआप एक मर्यादा घालून दिली आहे. जाती-व्यवस्थेचे जे बळी आहेत त्यातच ही चळवळ आहे. त्यामुळे दलित वर्गातील जातीच्या भिंती तुटण्याच्या ऐवजी आणखी प्रबळ होतानां दिसतात.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा गाभा शोधला असता त्यात स्वातंत्र्य, समता, न्याय व बंधुभाव ही मूल्य विशेषतः दिसून येतात. त्यांनी एकंदरीत दलित, वंचित,दूर्बल अशा अनुसूचित जाती, अदिवासी ,महिला इत्यादींना प्रस्थापितांच्या गुलामगीरीतून मुक्त करण्यासाठी अशा सर्वच धार्मिक रुढी, परंपरा व धार्मिक संस्कृती मुल्यांचा विरोध केला. व्यक्ती -व्यक्तीत व स्त्री-पुरुष बाबत विषम समाजव्यवस्था निर्माण करणाऱ्या जाती-व्यवस्थेचा त्यांनी विरोध केला. समतेच्या तत्त्वावर आधारीत समाजव्यवस्थेचे समर्थन केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या अशा समतेच्या व सामाजिक न्यायाच्या विचारांना जातीय परिघात बंदिस्त केल्यास त्यांच्या विचारांचा वैश्विक संदर्भ हरवून बसतो.

लोकशाही मुल्यांवर विश्वास ठेवणाऱ्या डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी समता प्रस्थापित करण्याचा मार्ग म्हणून शासनामध्ये समाजातील दूर्बल, वंचित समुहांच्या प्रतिनिधीत्वाची

संकल्पना मांडली, समाजातील दुर्बल, वंचित घटकांना विधिमंडळा मार्फत शासनात प्रतिनिधीत्व, प्रशासकीय सेवाकार्यात म्हणजे शासन संचालनात प्रतिनिधित्व,स्थानिक निकाय व सर्व प्रकारच्या शासकीय नोकऱ्यांमध्ये प्रतिनिधीत्वाचा हक्क हा त्यांच्या मुलभूत हक्क मानला जावा त्यांना शासन प्रशासनातील हक्क दिले गेले नाहीत तर ' समतेचा हक्क' हा फक्त नावाला राहिल. दूर्बलांना समता प्राप्त करुन देण्यासाठी प्रतिनिधीत्वाचा म्हणजेच 'आरक्षणाचा हक्क' हाच खरा समतेचा हक्क होऊ शकतो विषम समाज रचनेत समानता प्रस्थापित करण्यास शोषित, पीडित, अल्पसंख्याक बहिष्कृत व निम्नस्तरीय समजल्या गेलेल्या वर्गाला प्रतिनिधीत्व म्हणजेच 'आरक्षण' होय. [१] आरक्षण किंवा वंचित वर्गाना परिणामकारक प्रतिनिधित्व हेच खऱ्या समानतेचे तत्व होय.

महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे आरक्षण धोरणाचे प्रवर्तक आहे. म.ज्योतिबा फुलेंनी १९ ऑक्टोंबर १८८२ रोजी इंग्रज सरकारने शिक्षण विषयक प्रश्नासंबंधी विचार करण्यासाठी हंटर कनिशनची नेमणुक केली. या हंटर आयोगासमोर महात्मा ज्योतिबा फुले यांनी एक निवेदन सादर करुन शुद्रातिशुद्रांच्या मुलांसाठी मोफत प्राथमिक शिक्षण व नोकरीत सामावून घेण्याची मागणी केली होती. त्यांच्या या मागणीतच आरक्षणाची बीजे पेरली गेली होती. त्यामुळे आरक्षण संकल्पनेचे जनक म्हणून महात्मा फुलेचा उल्लेख केला जातो. पुढे राजर्षी शाहू महाराजांनी २६ जुलै १९०२ रोजी त्यांच्या त्यांच्या करवीर संस्थानातील नोकऱ्यांमध्ये मागासवर्गीयांना ५० टक्के जागा आरक्षीत ठेवण्याचे आदेश जारी केले होते. त्यामुळे त्यांना आरक्षण धोरणाचे जनक मानले जाते. तर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आरक्षण धोरणाला सैद्धांतिक व संवैधानिक स्वरुप दिले त्यामुळे त्यांना आरक्षण धोरणाचे शिल्पकार मानले जाते. या आरक्षणाचा उद्देश तिन्ही विचारवंतानुसार समाजातील सामाजिक, शैक्षणिक राजकीय, व आर्थिक विषमता नष्ट करुन समता प्रस्थापित करणे हा आहे.

आरक्षण धोरणाच्या निर्मिती पासूनच त्याला सतत विरोध होत आला आहे. डॉ.बाबासाहेबांनी सायमन कमिशन पुढे साक्ष देतांना अस्पृश्यांकरीता जातवार प्रतिनिधित्वाची

मागणी केली होती.यावर काहीनी आक्षेप घेतला डॉ.आंबेडकर हे समाज समता संघाचे अध्यक्ष असतांना त्यांनी अस्पृश्य समाजासाठी जातवार प्रतिनिधीत्वासाठी मागणी करणे हे विषमता निर्माण करणारे नव्हे काय ? असे विरोधकांचे म्हणणे होते. या आक्षेपाला १ फेबुवारी १९२९ च्या बहिष्कृत भारतातील आग्रलेख 'समतेसाठीच ही विषमता' यात अत्यंत मुद्देसूद उत्तर देतांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात.

"समतावादयांचे ध्येय सर्वांना समतेने वागविणे हे नसून समता प्रस्थापित करणे हे आहे. हे ध्येय साधतांना सर्वांना समतेने वागवून चालणे शक्य नाही. जेथे सर्व व्यक्ती समान आहेत तेथे काही व्यक्तींना असमानतेने वागविल्यास विषमता उत्पन्न होईल. पण जेथे व्यक्ती असमान आहेत तेथे त्यांना सारख्या लेखून चालने म्हणजे समता प्रस्थापनेच्या ध्येयाला विरोध करणे हाये. "[2]

भारतीय संविधान व आरक्षण :

राज्यघटनेत दोन प्रकारचे आरक्षण आहे. 1) सामाजिक आरक्षण व 2) राजकीय आरक्षण सामाजिक आरक्षणानुसार अनुसूचित जाती जमाती विमुक्तांना शिक्षणातील प्रवेशासाठी व सरकारी नोकऱ्यांमध्ये राखीव जागाची तरतुद होय. पिढ्यान पिढ्या सामाजिक,आर्थिक व शैक्षणिक दृष्ट्या मागसलेल्या समाजाला पुढारलेल्या समाजाच्या बरोबरीने आणण्यासाठी विशेष संधी म्हणून आरक्षणाची तरतुद करण्यात आली. या सामाजिक आरक्षणाला घटनेत कुठेही मर्यादा घालण्यात आलेला नाही. ते भारतीय राज्यघटनेच्या कलम 15 (4) या कलमान्वये आहे.[3] हे आरक्षण वाढविण्याची आवश्यकता नसते. ते कलम मूलभूत अधिकारात समाविष्ठ आहेत. राज्यघटनेतील राजकीय आरक्षण हा दुसरा भाग आहे. त्याला 1932 ची गोलमेज परिषद आणि गांधी आंबेडकर पूणे कराराची पार्श्वभूमी आहे या कराराचा परिणाम म्हणून अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदार संघाचा आग्रह सोडून राखीव मतदार संघावर समाधान मानावे लागेल. स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेत तीच संकल्पना पुढे चालू ठेवण्यात आली. भारतीय घटनेच्या कलम 330 आणि 332 अनव्ये हे राजकीय आरक्षण मिळाले आहे.

[4] हे दर 10 वर्षानी वाढविले जाते लोकसभा व राज्यसभा, विधानसभेमध्ये अनुसूचित जाती व अनूसूचित जमाती मतदार संघ ठेवणे अशी तरतुद करण्यात आली.

भाररतीय घटनेनुसार आज केंद्रानुसार अनुसूचित जातींना सामाजिक व राजकीय आरक्षण 15% देण्यात आले आहे. अनुसूचित जातींना 7.5 टक्के आरक्षण देण्यात आहे. तसेच महाराष्ट्रात आजघडीला अनुसूचित जातींना 13% टक्के आरक्षण लागू केलेल आहे. तर अनुसूचित जमातींना 7 टक्के आरक्षण लागू केलेले आहे.[5]

अनूसुचित जाती व आरक्षण वर्गवारीची मागणी:

महाराष्ट्र राज्यात अनुसूचित जाती प्रवर्गात 59 जातींचा समावेश होतो. यात नवबौद्ध (महार),मातंग (मांग),चर्मकार (चांभार) या तीन प्रमुख जातीची लोकसंख्या 90 टक्के आहे. तर उर्वरीत 56 अनूसूचित जातींची लोकसंख्या हीएकूण अनुसूचित जातीच्या लोकसंख्येच्या 10 टक्के आहे. यापैकी 28 अनुसूचित जातींची लोकसंख्या 1000 पेक्षा कमी आहे. अनुसूचित जाती मध्ये लोकसंख्येनुसार महार, मांग, चांभार जातींचा क्रमांक अनुक्रमे पहिला, दुसरा तिसरा आहे सन 2011 च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रात अनुसूचित जातींची लोकसंख्या ही 1,32,75,898 असून एकूण लोकसंख्येच्या अनुसूचित जातीच्या लोकसंख्येचे प्रमाण 11.2 टक्के आहे.[6]

अनुसूचित जाती प्रवर्गातील सर्व जातींचा सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व सांस्कृतिक दर्जा सारखाच असल्या कारणाने घटनाकारांनी त्यांना अनुसूचित जाती प्रवर्गात समाविष्ट केल. या 59 जाती अनुसूचित जाती प्रवर्गात समाविष्ट केले, या 59 अनुसूचित जाती केंद्रात 15 टक्के आरक्षण व महाराष्ट्र राज्यात 13 टक्के आरक्षणाच्या लाभार्थी आहेत. या आरक्षणाचा लाभ घेण्यास सर्व जातींना समान संधी आहे. आज 68 वर्षानंतर या जाती समुहाच्या आरक्षण लाभाचा व त्यातून त्यांनी साधलेल्या विकासाचा अभ्यास केला असता असे आढळून येते की, नवबौद्ध या जातीने आरक्षणाचा सर्वाधिक लाभ घेतला. त्यानंतर चर्मकार व ढोर या जातीचे

प्रमाण अधिक आहे. मात्र मातंग जातीला आरक्षणाचा त्याच्या लोकसंख्येच्या प्रमाणात म्हणावा तसा लाभ न झाल्यामुळे त्यांची आर्थिक सामाजिक स्थिती ही मागास असल्याची दिसून येते.

मातंग समाजाला त्यांच्या मागासलेपणाची जाणीव बऱ्याच उशीरा झाली. इतर अनुसूचित जातीच्या तुलनेत मातंगाच्या सामाजिक, आर्थिक मागासलेपणा हा त्यांच्या शिक्षणातील कमी प्रमाण व आजही धार्मिक रुढी-परंपरा यांना चिकटून राहणे हे असल्याचे दिसून येते. नवबौद्ध व चर्मकार व ढोर या जाती शिक्षणात अग्रेसर असून परिणामी आरक्षण लाभासही पात्र ठरल्या. महार- मांगातील पारंपारिक वाद,वैचारिक संघर्ष हा मातंगांना आंबेडकरी परिवर्तनवादी चळवळी पासून दूर ठेवत आला. परिणामातः मातंगाचे मागसलेले पण हे तसेच राहिल. पुढे या कारणामुळे मातंग समाजातील नेते व पुढारी यांनी हळूहळू अनूसूचित जाती प्रवर्गाच्या आरक्षणातून मातंगांना स्वतंत्र्य आरक्षण देण्यात यावे अशी मागणी केली. सन 1999 पासून बाबासाहेब गोपाले यांनी आखील भारतीय मातंग संघ आणि भारतीय बहुजन आघाडी या संघटनेमार्फत स्वतंत्र आरक्षणासाठी व्यापक स्तरावर संघर्ष सुरु केला. परिणामत 1 ऑगस्ट 2003 रोजी तत्कालीन मुख्यमंत्री सुशिलकुमार शिंदे यांनी मातंग समाजाचा सर्वकष अभ्यास करुन स्वतंत्र आरक्षणाची शिफारस करण्यासाठी 'क्रांतीविर लहुजी साळवे मातंग अभ्यास आयोगाची' स्थापना करण्यात आली. या आयोगाच्या अध्यक्षपदी बाबूराव भारस्कर तर उपाध्यक्षपदी बाबासाहेब गोपले यांची निवड करण्यात आली. या आयोगाकडून मातंग समाजाचा अभ्यास करुन मातंग समाजाच्या विकासासाठी व स्वतंत्र आरक्षणासाठी अभ्यासपूर्ण व सैद्धांतीक दृष्ट्या परिपूर्ण अहवाल सादर करणे आवश्यक होते. मात्र आयोगाच्या सदस्यातील मतभेदामुळे शासनाकडे दोन अहवाल सादर करण्यात आले. या दोन्ही अहवालाचा अभ्यास करुन महाराष्ट्र शासनाने 82 शिफारशी पैकी 14 शिफारशी ज्यात स्वतंत्र आरक्षणाची मागणी करणाऱ्या मागण्या होत्या त्यासहित नाकरुन 68 शिफारशी मान्य केल्या. स्वतंत्र आरक्षणाच्या शिफारशी मान्य न केल्यामुळे मातंग समाजातील अनेक संघटना या वेळोवेळी त्याची अमंलबजावणी करण्याची मागणी आंदोलने व मोर्च्याच्या माध्यमातून करत आहेत. अनूसूचित जातींची अ,ब,क,ड अशी वर्गवारी करावी अशी मागणी घेऊन 17

नोव्हेंबर 2017 ते 20 डिसेंबर 2017 दरम्यान लहूजी शक्ती सेनेचे अध्यक्ष विष्णूजी कसबे व कार्यकर्त्यांनी पदयात्रा काढून नागपूर अाविवेशनावर मोर्चा नेला.[8]

आरक्षण व जाती आरक्षणाचे राजकारण :

लोकसभा अथवा विधानसभा निवडणुका लागल्या की आरक्षणाचे वारे जोरात वाहू लागते. कुठल्याही नेत्यांनी उठावे अन मतपेटीच्या राजकारणाचा विचार करुन आरक्षणाच्या मागणीला पाठिंबा दर्शवायचा आरक्षण मिळविण्यासाठी ज्या प्रमाणे स्पर्धा सुरु होते त्याचप्रमाणे प्रत्येक पक्ष मी कसा तुमचा जवळचा आहे किंबहुना कैवारी आहे यासाठी नेते व पक्षात स्पर्धा सुरु होते. या सर्व प्रकारामुळे जातीभेद वर्णभेद संपण्याऐवजी तो अधिकदृढ होताना दिसतो. देशाची एकता यामुळे धोक्यात येईल याची चिंता सत्ताधारी व विरोधी पक्ष करतांना दिसत नाही.

भारतात बहुतांश राज्यात कोणतीना कोणती जात ही आरक्षणाची मागणी करताना दिसते. यात राजस्थानमध्ये गुज्जर, गुजरात, मध्ये पटेल,महाराष्ट्रात मराठा, आंध्रप्रदेश मध्ये कोपा या जाती आरक्षणासाठी त्यांच्या राज्यात चळवळी व आंदोलन करत आहेत. या सर्व जाती प्रस्थापित उच्चवर्णीय असून शिक्षणात, व्यापारात,राजकारणात, समाजकारणात अनेक वेळा नेतृत्व केलेल्या जमाती आहेत. या जातींच्या मागण्यांना मतदानाच्या तत्कालीन फायद्यासाठी अनेक नेते व पक्ष पाठिंबा देतात मात्र जेव्हा सत्तेत येतात तेव्हा कायद्याने आरक्षण देणे आवघड जाते. हे महाराष्ट्रात मराठा आणि मुस्लीम, राजस्थान-हरियानात जाट आणि गुज्जर, गुजरात मध्ये पटेल तर ताजे उदाहरण म्हणजे आंध्रप्रदेशातील कोपा समाजाचे आरक्षण तेलगुदेसम् सरकारला डोके दु:खी ठरत आहे.

ज्या प्रमाणे उच्चजाती आरक्षणाची मागणी करत आहेत त्याच प्रमाणे भारतातील अनेक राज्यातून अनूसूचित जाती प्रवर्गातून देखील वेगळ्या आरक्षणाची किंवा आरक्षणाची अ,ब,क,ड वर्गवारीची मागणी होत आहे. आरक्षणाच्या विषम लाभामुळे अनुसूचित जातीत काही जाती हया आरक्षण फायदा घेऊन सामाजिक, आर्थिक व राजकीय दृष्टया सक्षम झाल्या

आहेत. मात्र याच प्रवर्गातील काही जातींना मात्र आरक्षणाचा विशेष लाभ न झाल्यामुळे त्यांची म्हणावी तशी प्रगती झाली नाही. त्यामुळे पंजाब, हरियाणा, कर्नाटक, आंध्रप्रदेश, तामिळनाडू व महाराष्ट्रात अनुसूचित जातीच्या आरक्षणाची वर्गवारीची मागणी पुढे आली आहे.

इतर राज्याच्या तुलनेत जेव्हा महाराष्ट्रातील अशा स्वरुपाच्या आरक्षण वर्गवारीच्या मागणीचा विचार होतो तेव्हा त्याला विशेष असा संदर्भ प्राप्त होतो. महाराष्ट्र राज्य हे फुले-शाहू -आंबेडकरांची कर्मभूमी असलेले राज्य होय. त्यामुळे आरक्षणाच्या दृष्टीकोणातून हया मागणीचा अभ्यास होणे गरजेचे आहे.डॉ. बाबासाहेब, आंबेडकर यांनी आरक्षणाची मांडणी ज्या सैद्धांतिक भूमिकेतून केली ती भूमिका, त्यामागील जातीअंत करुन सामाजिक न्याय स्थापनेचा उद्दात हेतू आज किती प्रमाणात यशस्वी झाला हे ही अभ्यासणे गरजेचे आहे.

शेड्युल्ड कास्ट फेडरेशन रद्द करुन सर्व वंचित दलित, आदिवासी व महिलांना समान न्याय हक्क देणाऱ्या रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडियाची स्थापना केली. त्यामाध्यमातून बहुजन दलित समाज हा सत्ताधारी जमात बनावी हे स्वप्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी पहिले होते. जातीअंत करुन वर्गीय लढा उभा राहावा अशी त्यांची अपेक्षा होती. डॉ.बाबासाहेबाचा सामाजिक न्यायाचा लढा हा जाती अंताकडून समाजवादी समताधिष्ठीत समाजरचनेचा होता ज्यामुळे सर्व वंचित मुख्यप्रवाहात येणार होते. परंतू राजकीय ध्रुवीकरणामुळे ते घडून आले नाही. डॉ. आंबेडकरांच्या समाजिक क्रांतीच्या लढ्यातून उभी राहिलेली चळवळ व दलित चळवळ या उद्देशात किती प्रमाणात यशस्वी ठरली. याचा अभ्यास करणे गरजेचे आहे. महाराष्ट्रात आंबेडकरी चळवळीच्या शिलेदारांपैकी एक जात म्हणजे मातंग समाज होय. मातंग समाज स्वतंत्र आरक्षणाच्या मुद्यावरुन कुठेतरी आंबेडकरी चळवळीपासून दूर जातना दिसते. एक विचाराने, एक गटाने चालणारे वर्ग आज आपआपले हितसंबंध घेऊन विरुद्ध दिशेने जातांना दिसत आहेत. याचा फायदा प्रस्थापितांच्या राजकारणाला पाठबळ मिळण्यासाठी होत आहे. मतांच्या राजकारणातून व तत्कालीन फायद्यासाठी प्रस्थापितांचे राजकीय पक्ष मातंग समाजाचा जिव्हाव्याचा प्रश्न म्हणजे स्वतंत्र आरक्षणाचे राजकारण करतांना दिसतात. या सर्वच

गोष्टीचा महाराष्ट्रातील दलित चळवळ, दलित राजकारण आणि एकंदर महाराष्ट्राच्या राजकारणावर परिणाम होतांना दिसतो.

1.2 समस्या सूत्रण :

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर 26 जानेवारी 1950 रोजी भारतीय राज्यघटनेची अंमलबजावणी सुरु झाली. वर्षानुवर्षाच्या सामाजिक विषमतेमुळे राजकीय सत्तेपासून,निर्णय प्रक्रियेपासून सामाजिक प्रतिष्ठेपासून वंचित असलेल्या अनुसूचित जाती व जमातींना राष्ट्राच्या मुख्य प्रवाहात आणून सामाजिक न्यायाच्या प्रस्थापनेसाठी राखीव जागा म्हणजेच आरक्षणाचे प्रावधान राज्यघटनेत करण्यात आले. त्यानुसार अनुसूचित जातींना केंद्रात 15 टक्के राजकीय व शासकीय नोकऱ्यात व शिक्षणात आरक्षण देण्यात आले तर महाराष्ट्रात 13 टक्के आरक्षण देण्यात आले. संविधानाच्या अमंबजावणी नंतर काही जातींना आरक्षणाचा पुरेपूर लाभ घेता आला तर काही जाती हया आरक्षणाचा पुरेपूर लाभ घेण्यास असमर्थ ठरल्या. त्यापैकी मातंग ही अनुसूचित जातीपैकी क्रमांक दोनची अधिक लोकसंख्या असलेली जात होय. नवबौद्ध व चर्मकार या जातीच्या तुलनेत मातंग समाजाला आरक्षणाचा विशेष लाभ झाला नाही. त्याचे कारण त्यांचे शिक्षणातील कमी प्रमाण असणे आहे काय ? शिक्षणातील कमी प्रमाण व शासकीय नोकऱ्यातील कमी प्रमाण यांचा संबंध आहे काय? आरक्षणाचा कमी लाभ मातंगास मिळण्यात नवबौद्धांच्या अधिक आरक्षणाशी काही सहसंबंध आहे काय? मातंग समाजाच्या स्वतंत्र आरक्षणच्या मागणीमुळे आंबेडकरी चळवळीचे ध्रुवीकरण होत आहे काय ? बौद्धांची स्वजातिय अस्मीता व स्वतंत्र आरक्षणाची गरज या गोष्टी मातंग समाज व डॉ.आंबेडकरांच्या जातीअंताच्या लढयास परत जातीच्या परिघात नेत आहेत का ? अशा अनेक समस्यांचा शोध घेण्याच्या उद्देशाने प्रस्तुत विषय "अनुसूचित जाती प्रवर्गातील पोट आरक्षणाचे जातीय राजकारण: मातंग समाज एक चिकित्सक अभ्यास " (विशेष संदर्भ मराठावाडा प्रदेश) हा निवडण्यात आला आहे.

1.3 संशोधनाचे उद्देश :

1) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची आरक्षण धोरणा मागील भूमिका व सद्य:स्थितीचे अध्ययन करणे.

2) मातंग समाजाच्या शैक्षणिक व सामाजिक परिस्थितीचा अभ्यास करणे.

3) महार समाज व मातंग समाजाच्या राजकीय सहभाग व राजकीय संघटनेचा अभ्यास करणे

4) अनुसूचित जातीतील पोट आरक्षणाच्या मागणीमुळे दलित चळवळ व दलित राजकारणावर होणाऱ्या परिणामाचा अभ्यास करणे.

5) मातंग समाजाच्या पोट आरक्षणाच्या मागणीचा अभ्यास करणे.

1.4 संशोधनाची गृहीतके

1) मातंग समाजाला शिक्षणाच्या अभावामुळे आरक्षणाचा पुरेपुर फायदा झाले नाही.

2) बौद्ध समाजाच्या तुलनेत मातंग समाजात राजकीय सहभाग व संघटन उशीराने निर्माण झाले.

3) अनुसूचित जातीतील पोट आरक्षणाच्या मागणीमुळे दलित राजकारणाचे ध्रुवीकरण होत आहे.

4) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित जातीअंताचा लढा पोट आरक्षणामुळे जातीय लढ्यात परिवर्तीत होत आहे.

5) मातंग समाजाची पोट आरक्षणाची मागणी महार विरुद्ध मांतग अशा स्वरुपाची आहे.

1.5 अध्ययनाची पद्धती :

प्रस्तुत संशोधनात वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे. प्रस्तुत संशोधन हे प्राथमिक व दुय्यम साधन सामग्रीवर आधारीत आहे. प्राथमिक माहितीत मुलाखती, प्रश्नावली द्वारे नमुना पद्धतीने महाराष्ट्रातील बहूल केंद्री चळवळी स्थळी प्रश्नावली किंवा मुलाखती द्वारे माहिती संकलित करण्यात येणार आहे.

द्वितीय माहितीत महाराष्ट्रातील "अनुसूचित जाती प्रवर्गातील पोट आरक्षणाचे जातीय राजकारण: मांतग समाज एक चिकित्सक अभ्यास" (विशेष संदर्भ मराठवाडा प्रदेश)" याचा अभ्यास करण्यासाठी भारत, राज्य, विभागीय व जिल्हापातळीवर आवश्यक ती माहिती प्रकाशीत

झालेल्या माहितीतून घेण्यात येईल. आवश्यक ती दुय्यम स्वरुपाची माहिती प्राप्त करण्यासाठी भारतीय संविधान, भारतीय जनगणना अहवाल, शासनाचे विविध अहवाल, महाराष्ट्र शासनाचे विविध प्रकाशने विभागी पातळीवरील विविध चळवळीचे अहवाल, महाराष्ट्राचा गोषवारा,मानव विकास अहवाल ,महाराष्ट्र शासनाचे विविध प्रकाशने विभागीय पातळीवरील विविध चळवळीचे अहवाल, मानव विकास अहवाल यांचा मुख्य स्त्रोत म्हणून उपयोग करण्यात येणार आहे या बरोबरच विविध प्रकाशने, पुस्तके, नियतकालीके, साप्ताहिके आणि वृत्तपत्रे यामध्ये प्रसिद्ध झालेल्या माहितीचा उपयोग करण्यात येईल.

सांख्यिकीय साधनात सारणीयन, प्रतिशत प्रमाण, निर्देशांक या सर्व साधनांचा उपयोग करण्यात येणार आहे.

1.6 संशोधनाचे महत्व :

महाराष्ट्रातील बहुतेक अभ्यास हा एखाद्या राजकीय चळवळीचा,राजकीय नेत्याचा राजकीय पक्षाचा, एखाद्या सामाजिक संघटनेचा, एखाद्या पोटजातीचा करण्यात आला आहे एकूणच महाराष्ट्रातील पोट जातीय आरक्षण प्रक्रियेचा अभ्यास झालेला नाही. म्हणूनच महाराष्ट्रातील "अनुसूचित जाती प्रवर्गातील पोट आरक्षणाचे जातीय राजकारण: मातंग समाज एक चिकित्सक अभ्यास" (विशेष संदर्भ मराठवाडा प्रदेश) असा विषय घेऊन महाराष्ट्रातील अनुसूचित जाती प्रवर्गाचा, आरक्षणाचा, अंतर्गत पोटजाती आरक्षणाचा व यापासून होणाऱ्या राजकीय परिवर्तनाचा इत्यादींचा एकत्रीत पहिलाच अभ्यास आहे. त्यामुळे भारत सरकार, महाराष्ट्र सरकार जनतेस विविध संस्था विविध राजकीय पक्ष यांना आरक्षणाचे धोरण ठरविण्यात ही संपूर्ण माहिती उपयुक्त ठरेल या सर्व दृष्टीकोणातून या अभ्यासाचे महत्व आहे.

1.7 संशोधनाच्या मर्यादा

प्रस्तुत अभ्यास हा प्राथमिक व दुय्यम सामग्रीवर आधारित आहे. योग्य व विश्वसनीय आकडेवारीचा आभाव, विविध पद्धतीने जमा केलेली आकडेवारी, शासकीय गोपनियता व समाजातील लोकांच्या अपूर्ण माहितीमुळे सामग्री संग्रहवर मर्यादा पडतात काही वेळेस ग्रामीण भागातील आशिक्षीत जनता माहिती देऊ शकत नाही, काही राजकीय पक्षाकडून आरक्षणाच्या संदर्भात परिपूर्ण माहिती पुरेशी उपलब्ध होत नाही. माहितीचा अपुरेपणा ही या संबंधीची मर्यादा आहे.

प्रकरण योजना : Chapter planning

प्रस्तुत संशोधन विषयाचे पैलू लक्षात घेऊन अभ्यासकरीता प्रकरण मांडणी सहा प्रकरणात करण्यात आली आहे.

प्रकरण पहिले - प्रस्तावना :

प्रस्तुत प्रकरणात आरक्षणाची संकल्पना, आरक्षणाची पार्श्वभूमी,फुले,शाहू आंबेडकराची आरक्षण धोरणातील भूमिका व योगदान, आरक्षणाची गरज व महत्व, आरक्षणाची सैद्धांतीक बाजू, पोट आरक्षणाचा अर्थ इ.चा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरेः संशोधन पद्धती :

प्रस्तुत प्रकरणात संशोधन पद्धती, संशोधनाचे उद्देश संशोधनाची गृहितके, संशोधनाचा आराखडा , नमुनानिवड, तथ्यसंकलन,संशोधनाची व्याप्ती व मर्यादा, प्राथमिक व दुय्यम स्त्रोत, पुर्व संशोधन साहित्याचा आढावा व प्रकरणाची रुपरेषा स्पष्ट करण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे - महाराष्ट्रातील अनूसूचित जाती व घटनात्मक तरतुदी

प्रस्तुत प्रकरणात अनुसूचित जातींचा पूर्व इतिहास, त्यांच्या प्राचीन कालीन, मध्ययुगीन,पेशवेकालीन व स्वातंत्र्यपूर्व काळातील सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक स्थितीचा व सध्यकालीन संवैधानिक दर्जाचा सखोल अभ्यास करण्यात येणार आहे. तसेच प्रकरण तिसरे मध्ये अनुसूचित जातीसाठीच्या संविधानिक तरतुदींचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे : डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची आरक्षण विषयक भूमिका व सद्य:स्थिती

प्रस्तुत प्रकरणात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची आरक्षण विषयक भूमिका, आंबेडकर कालीन व आंबेडकरी? तर आंबेडकरी चळवळ व या चळवळीतील बौद्ध व बौद्धत्तरांचा सहभाग व संघटनांचा अभ्यास करण्यात येणार आहे.बौद्ध व बौद्धत्तर आरक्षण विषयक भूमिका याचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे : अनुचूचित जाती प्रवर्गातील पोट आरक्षणाचे जातीय राजकारण

प्रस्तुत प्रकरणात अनुसूचित जातीतील पोट आरक्षणाची मागणी व त्या अनुषंगाने होणारे जातीय राजकारण याचे निरीक्षण, राजकीय नेते व सामान्य नागरिकांकडून प्रश्नावली, अनूसुची व प्रत्यक्ष चर्चेतून प्राप्त होणाऱ्या माहितीच्या आधारे प्रस्तूत प्रकरणात विवेचन करण्यात येणार आहे.

प्रकरण साहवे : निष्कर्ष आणि शिफारशी

शोधप्रबंधातील शेवटचे प्रकरण निष्कर्ष व शिफारशीचे आहे. प्रस्तुत प्रकरणात संशोधन विषयाचा सारांश, निष्कर्षाशी गृहितकांची पडताळणी आणि शिफारशी सुचविण्यात येणार आहे.

संशोधन कार्याचे त्रिवार्षिक नियोजन -

प्रथम वर्ष -

प्रथम वर्षात पूर्व साहित्याचा आढावा, संदर्भ साहित्याचे व संशोधनाचे संकलन, संबंधीत माहिती कागदपत्रे व पद्धतीचे संकलन.

द्वितीय वर्ष :

द्वितीय वर्षात नमुन्याचे संकलन आणि संग्रहीकरण,नमुन्याचे सादरीकरण, प्रश्नावली,मुलाखती, चर्चा जमा करणे.

तृत्तीय वर्ष :

तृत्तीय वर्षात माहितीचे विश्लेषण,अर्थनिर्वचन,निष्कर्ष,शिफारशी, अहवालाची छपाई व बांधणी, सादरीकरण.

संदर्भग्रंथ सूची :

1) आंबेडकर डॉ.बाबासाहेब, पुणे करार,नाग-नालंदा प्रकाशन, इस्लामपूर,आवृत्ती प्रथम,1932

2) आगलावे,डॉ.प्रदीप,सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, आवृत्ती तिसरी, 2010.

3) कराडे, जगन्नाथ,आरक्षण,धोरण आणि वास्तव, सुगावा प्रकाशन, पुणे- 2005.

4) कांबळे नारायण व इतर, आरक्षण सत्य व विपर्यास, चिन्मय प्रकाशन औरंगाबाद, आवृत्ती पहिली, 2008.

5) कामत सतीश (संपा.), 'राज्यघटनेतील सामाजिक ध्येयवाद आणि राखीव जागा' बाळ प्रकाशन, सातारा,२००२.

६) कीर धनंजय, 'राजश्री शाहू छत्रपती - एकसमाजकांतिकारक राजा', पॉप्युलर प्रकाशन, आवृत्ती पहिली १९७९.

८) कुंभार नागोराव, आरक्षण का व कसे ? प्रकाशन,लातूर फेब्रुवारी २००७.

११) गायकवाड प्रदीप, आरक्षण डॉ. आंबेडरांची गाजलेली भाषणे व लेख (संपा,), अ.भा.आंबेडकरी आर्थिक न्याय परिषद नागपूर, आवृत्ती दुसरी १४ एप्रिल २०१०.

१२) गायकवाड प्रदीप,संविधान सभेतील वाद विवाद (संपा.), समता प्रकाशन नागपूर, आवृत्ती चवथी, २६ नोव्हेंबर २०१४.

१३) गुप्ता, राजेशकुमार, भारत में आरक्षण नीती, मानक पब्लिकेशन, प्रा.लि.दिल्ली.

१५) मुणगेकर भालचंद्र, भारतातील आर्थिक सुधारणा व दलित एक आंबेडकरी दृष्टीकोन, सुगावा प्रकाशन,पुणे- २००६.

१६) मोरे सुबोध व इतर, आरक्षण, भ्रम आणि वास्तव, निर्माण प्रकाशन, नवी मुंबई, आवृत्ती पहिली, १९९९.

१७) फडके य.दि., ' राखीव जागांची शंभर वर्ष मं. सुगावा प्रकाशन, ' पुण १४ एप्रिल २००६.

१८) फडके, यशवंत दिनकर (संपा.) म.फुले समग्र वाड्मय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई- १९९१.

२०) नाडगोंडे गुरुनाथ, 'सामजिक संशोधन पद्धती' फडके प्रकाशन, कोल्हापूर १९९९.

२१) निकम श्रीराम, गांधी- आंबेडकर अस्पृश्य मुक्ती संघर्ष, लोक वाड्मय गृह प्रकाशन, मुंबई,आवृत्ती प्रथम २००८.

२२) पंदेरे शांताराम ,डॉ.आंबेडकर आणि राखीव जागांचा प्रश्न, डॉ.बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९९१.

२३) पळशीकर सुहास, जात व महाराष्ट्रातील राजकारण, सुगावा प्रकाशन पुणे.

२४) भोळे भा.ल., 'विसावे शतक आणि भारतातील समता विचार', आंबेडकर अकादमी, नागपूर, १९७४.

२५) राजकिशोर, 'दलित राजनिती की समस्याएँ, ' वाणी प्रकाशन ,नई दिल्ली.

२६) शशि, डॉ.शामसिंह, कैलाश चंद्र सेठ, बाबासाहेब डॉ.आंबेडकर खंड-५ डॉ.आंबेडकर गोलमेज सम्मेलन में (संपा.), डॉ.आंबेडकर प्रतिष्ठान सामाजिक न्याय और अधिकारिता मंत्रालय भारत सरकार नई दिल्ली, आवृत्ती चौथी,२०१३.

२७) सिंह श्यामनंदन,भारत कें आरक्षण नीति :एक समीक्षाम,चतुर्वेदी, मिना सोहनलाल, राजनितीके आयाम, प्रिन्टवेल प्रकाशन, जयपूर.

२८) सुमंत यशवंत, दत्तात्रय पुंडे, महाराष्ट्रातील जाति संस्थाविषयक विचार, प्रतिभा प्रकाशन, पुणे, जुलै २००६.

२९) Ambedkar Dr. B.R., States and Minorities, Samta Publication. Delhi.

३०) C. Parvathamma, Scheduled Cast and Tribes (A Scio-Edonomic Survery.) Ashish Publishing House, New Delhi, १९८४.

३१) Ghurve, G.S., Cast, Class and occupation , Popular Book Depot. Bombay, १९६१.

३२) Gopal Guru Dr., The Sheduled Cast Politics in Reserved Constituency, Unpblished M.Phil, Thesis, S.N.U. Delhi १९७९.

३३) Joshi Babara, ' Democracy in search of Equallity, Hindustan Publishing Corporation, New Delhi, १९८२.

३४) More Glanter, ' Law and society in Modern India, 'Oxford, New Delhi, १९९७.

३५) Pai Panadiker, the polities of back wardness : Reservation Policy in India, Konark Publishers, New Delhi, V. २००९

३६) Santosh Kumar, Social Justice and the polities of Reservation in India, Mittal Publition, New Delhi, V २००८.

३७) Tripathy R.B., Dalits, : A Sub Human Society, Ashish, Delhi, १९९४

३८) Venkateshwarla D., Harijan - Upper Class Conflict, disocovery Delhi, १९९०

३९) Wgmhamre B.S., The other Dalit Voice in Indian Politics, A study of Socio political Inequality within Dalit in Maharashtra, Kapna, Prakashan, Nanded १९९७.

संशोधक

संतोष भिमराव मोरे
एम.ए. (राज्य),सेट एम.एड्.
पिपल्स कॉलेज नांदेड

मार्गदर्शक

डॉ.बी. एम.नरवाडे
(एम.ए.,एम.फिल,पीएच.डी.)
सहाय्यक प्राध्यापक
श्री दत्त कला,वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय हदगांव जि.नांदेड